# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१५.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

=============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकुल व लाभदायक होईल. व्यवसायानिमित्तपरधर्मियांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे अधिक धनलाभ होणे संभवते. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल व धनलाभ होईल. पण वर्तमान काळात या राशीच्या मंडळीचा स्वभाव अत्यंत लहरी होण्याची शक्यता जाणवते. स्वभावावर नियंत्रण ठेवले नाहीत तर मात्र विपरीत परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. अविचाराने खर्च होणार नाही, याची काळजी घ्या. नपेक्षा आर्थिक समस्या त्रस्त करतील. जपा. शत्रूराशीत असलेला शनी ग्रह मानसिक आरोग्य बिघडवू शकेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभू शकेल. सज्जनांचा सहवास लाभेल. काही मंडळीचे कौतुक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्माण होतील. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीशी मतभेद, भांडणे होणे संभवते. जपा. तसेच काहीना पोटविकार तर काहीना मूत्राशयविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. श्रद्धेने शिवोपासना करा. तसेच श्रीगणेश उपासना व हनुमान उपासनाही अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना यामहिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्धकाही प्रमाणात अनुकुल होईल. केवळ मानसोपचार तज्न्य व द्रव पदार्थांचे व्यापारी यांनाच संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता आहे. तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:चे व मुलांपैकी कोणाचे अनारोग्य मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. तसेच विविध कारणांनी अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. मंगळ ग्रहाच्या प्रतिकुलतेमुळे कौटुंबिक

सुखात विविध कारणानी बाधा निर्माण होणे संभवते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील. तरीही गुरु ग्रहामुळे नातेवाईक मंडळीकडून त्रास होण्याची शक्यता दिसते. पण हाच गुरु ग्रह स्थावर खरेदी विक्री व्यवहारास अनुकुल व लाभदायक होईल. शुक्रामुळे मित्रसुख व ऐषआराम मिळू शकेल. तसेच ज्यांची शेतीवाडी असेल अशांना त्यापासून लाभ होण्याची शक्यता आहे. लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे निर्णायक असे काहीच घडण्याची शक्यता दिसत नाही. उलट मित्रांशी भांडणे होऊन शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यताच अधिक दिसते जपा. पण लाभस्थानी हर्षलसह असलेला केतू काही प्रमाणात सुख, समाधान , यश व शांती देऊ शकेल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासनाव श्री हनुमान उपासना मन:शांती देऊ शकेल.

(३) **मिथुन** - या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरी वा व्यवसायच नेकीने करावा. स्वत:च्या हातचे सोडून नवीन काही करण्याचा प्रयत्न मुळीच करू नये. नुकसान होईल व पश्चात्ताप करावा लागेल. जपा. चिकित्सक बौद्धिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मुत्सद्दी , राजकारणी असणारांना काळ लाभदायक होईल. आरोग्याचे दृष्टीने पाहता वातपित्ताचा त्रास होणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. रवि ग्रह प्रतिकूल असल्यामुळे प्रिय जनापासून दुरावा सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच कौटुंबिक मतभेद, वाद, भांडणे अशामुळे असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, खर्चात वाढ होणे अशापैकी कारणांनी गहरे नैराश्य येणेही शक्य दिसते. जपा. पण गुरु-शुक्र -बुध हे शुभ ग्रह अनुकुल असल्यामुळे मित्रसुख लाभेल. प्रवासाचे योग येतील, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राहकाकडूनच अधिक आर्थलाभ होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे काहीना भूमिलाभ, काहीना मान-प्रतिष्ठातर काहीना धनलाभ होणेही संभवते. मंगळ ग्रहामुळे धैर्य , हिम्मत व महत्वाकांक्षा वाढेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

(४) **कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनुकूल प्रतिकुल असे

विविध प्रकारचे अनुभव येतील व त्यानुसार सुखदु:ख सहन करावे लागेलसे दिसते, अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या येणे संभवते. त्या कशा पूर्ण होतील याची चिंता त्रस्त करील. आर्थिक येणे येणार नाही, पण देणे मात्र द्यावेच लागेल. त्यामुळे त्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक कष्ट परिश्रम करावे लागतील. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होईल व शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. घसा, दाढा, मान यांचे दुखणे त्रस्त करील. काहीना डोळ्याची दुखणी होतील. अशा परिस्थितीत शत्रुत्व निर्माण होणार नाही, याची काळजी घ्या. पण छुप्या शत्रूंचा त्रास होण्याची शक्यताही नाकारता येत नाही जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. काहीना पगारवाढ, काहीना बढती, क्वचित कोणास उच्च पद, तर अन्य कोणास मानाचे स्थान प्राप्त होणे संभवते. वरिष्ठ तुमच्या कामाचे कौतुक करतील. पण राहूमुळे काहीना कोर्ट लचांड त्रस्त करील तर कोणाच्या बंधुसुखात बाधा निर्माण होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे काहीना गहरे नैराश्य येईल व शारीरिक अनारोग्यास तोंड द्यावे लागेल. पंचम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनीमुळे अपेक्षित संततीसुख मिळणार नाही. मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास त्रस्त करील. कोणास निरुत्साह वाटेल. या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात पाण्यापासून जपावे. तसेच विषबाधा होण्याची शक्यताही दिसते. जपा. “वरून कीर्तन , आतून तमाशा “ अशा प्रकारचे आचरण करू नका. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल होईल. परदेशगमनाची संधी मिळेल. मन:शांतीसाठी आवडत्या दैवताची उपासना करा.

(५) **सिंह** - या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात आपल्या अहंकारी व संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवून व जिभेला लगाम घालून आचरण केले तरच शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा सुखानंद अनुभवणे त्यांना शक्य होईल. जिद्दी स्वभावामुळे अकारण कष्ट, दगदग होऊन शारीरिक अनारोग्य होणे संभवते. जपा. आर्थिक चिंता व कौटुंबिक कलह त्रस्त करतील. त्यामुळे उष्णता भडकून नेत्रविकार बळावणे संभवते. जपा. तसेच काही मंडळीना त्वचारोग, रक्तविकार, मुखदंतविकार अशापैकी आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता जाणवते. अपघात भय आहे. जपा. वैवाहिक सुखाचे दृष्टीनेही काळ अनुकुल होईल्से दिसत नाही. अशा विपरीत काळात मनावर व बुद्धीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल.

तरच गुरु-शुक्राच्याअनुकुलतेने अनारोग्य नियंत्रित राहू शकेल व वैवाहिक जीवनातील सुखातही फारशी बाधा येणार नाही. त्यामुळेच मानसिक सुखशांती लाभू शकेल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कामाची प्रशंसा करतील. काही मंडळीना बढती, काहीना उच्च पद तर काहीना एखादे मानाचे स्थान मिळणेही संभवते. या राशीच्या साहित्यिक मंडळीचे साह‍ित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्याची शक्यता दिसते. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना यश लाभू शकेल. श्रद्धा असेल तर श्‍रीहनुमान व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात विचारशक्तीवर ताबा ठेवून व मन शांत व स्थिर राखून आचरण केले तरच प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल व सर्व प्रकारचे अनारोग्यही फारसे बिघडणार नाही. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर अधिकच काळजी घेतली पाहिजे. काल्पनिक चिंता करू नका. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. अशा परिस्थितीत सहनशील होऊन मन शांत ठेवा. तरच वातविकार व उष्णता विकार नियंत्रित राहतील. काल्पनिक चिंता करू नका. आपल्याला काही आजार झाला आहे, अशी उगीचच शंका मनात येऊ देऊ नका. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करा. फसवणूक होणे संभवते. प्रिय जणांशी वाद, भांडणे टाळा. भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळीना कुसंगतीचा अनिष्ट परिणाम भोगावा लागेलसे दिसते. जपा. अध्यात्म , समाजसेवा अशा कार्यात रस असणारांनी ते कार्यच मनापासून करावे. त्यामुळेच मन:शांती लाभेल. या राशीच्या युवकांना उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. वौवाहिक जीवनात दोघात होणारे मतभेद, भांडणे, जीवनसाथीचे विचित्र आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर ती आशय मनस्ताप देतील जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेला मंगळ प्रतिकुल असल्यामुळे काही जुन‍ी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन मनस्ताप देतील. जपा. मन:शांतीसाठी श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(७) तुळा -** य‍ा राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक अनारोग्याला सामोरे जावे. लागण्याची शक्यता दिसते. धनस्थानी असलेला शत्रुराशीतील शनी आर्थिक चिंता निर्माण कारीलसे दिसते. तसेच तो कौटुंबिक

जीवनात अनिष्ट घटना घडविण्याची शक्यताही दिसते. अशा कारणांनी या राशीच्या मंडळीना असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी सहनशील बनून मन व विचारशक्ती शांत राखण्याचा प्रयत्न करावा, हर उत्तम. अध्यात्मास काळ अनुकुल असल्यान े मन शांत व स्थिर राखण्यासाठी आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवावे, असे सांगावेसे वाटते. अपेक्षाभंग व मनासारखे काहीच घडत नसल्याने गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. अति विचार करू नका. नपेक्षा असह्य डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या काही मंडळीना तर मेंदूविकाराचा आशय त्रास सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. जपा. अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट, परिश्रम करावे लागतील. पण अशा प्रतिकुल परिस्थितीतही काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने काही प्रमाणात इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. काहीना धनलाभ तर काहीना वाहनसुख मिळेल. या राशीच्या विवाहेच्चूंचे विवाह ठरतील व संपन्न होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचेनियमितपणे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे त्यांनी सतत सावधानतेने आचरण करणे जरूरीचे होईल. या महिन्याच्या काळात सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता आहे. प्रिय जनांमध्ये दूरत्व निर्माण होणे, जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात अधिक मनस्ताप होणे संभवते. जपा. संतापी, अहंकारी स्वभावाला लगाम घाला. सतत नम्रतेचे आचरण करा. “ महापुर े झाडे जाती, तेथे लव्हाळी वाचती“ हे तुकोबांचे वचन ध्यानात ठेवा. तरच होणारा मनस्ताप सुसह्य होईल. घरगुती परिस्थितीत गैरसमज होणार नाहीत, याची काळजी घेतलीत तर खूपच सुखाचे होईल. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. मात्र वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. स्वतंत्रव्यापार -व्यवसाय असणारानाही मह िन्याचा पूर्वार्ध लाभदायक होईल. बौद्धिकआणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या युवकांना नवीन काही करावेसे

वाटेल; पण तसा प्रयत्न करू नका. या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा त्रास होणे संभवते. या राशीच्या विद्‌यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान व श्रीगणेश उपासना मन:शांती देऊ शकेल.

(९) धनु - या राशीच्या व्ययस्थानी शत्रुराशीत शनी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने जपून व काळजी-पूर्वक करावेत. नपेक्षा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. सध्याचा काळ संकटे, अडचणीचा आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून विचारपूर्वक आचरण केलेत तर खूपच सुखाचे होईल. शासकीय, निम-शासकीय नोकदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्‌या ओळखी होतील. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल. काहींना मानाचे स्थान तर काहींना अधिकारपद मिळणे संभवते. सामान्य नोकरदार मंडळींनाही काही ना काही लाभदायक असे प्राप्त होईलच. त्यामुळे आर्थिक प्राप्तीही वाढेल. काळास अनुकुल असा स्वतंत्र व्यवसाय करत असणाऱ्या मंडळींनाही व्यवसायात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असण्याची शक्यता वाटते. त्‌यामुळे कोणाशी पटत नसावे, काही केले तरी मनाचे समाधान होत नसावे, असे वाटते. भावनेच्या भरात हातून नको ते घडण्याची शक्यता दिसते. विषभय आहे. जपा. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. नेपच्यून व गुरु हे दोन्ही ग्रह आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल आहेत. आध्यात्मात रस असणारांनी त्याचा लाभ घेऊन उपासनेद्‌वारे आध्यात्मिक प्रगती साधावी. शुक्राच्या अनुकुलतेमुळे गुरुकृपा, सुसंगती, थोरकृपा प्राप्त होईल व सात्विक सुखसमाधान लाभेल. श्रद्धेने दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

(१०) मकर - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे असह्य मनस्ताप होऊन शारीरिक उष्णता भडकेल व उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. विशेष करून काही मंडळींना मूळव्याधीचा त्रास होणे संभवते. इतरांना असह्य शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागण्याची शक्यता आहे. सतत सावधानतेने आचरण करा. कारण हाडमोड होणे

संभवते. जपा. काहीना मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य व अपेक्षित संततिसुख मिळणे अशक्य होईल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना प्रगतिकारक व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. मात्र आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. अशाही प्रतिकुल परिस्थितीत ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील तर त्यांना असा अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. तसेच काहीना भूमिलाभ, प्रतिष्ठा , मानसन्मान असे काही प्राप्त होण्याची शक्यता आहे. मन:शांतीसाठी श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

(११) कुंभ- सध्या या राशीच्या मंडळीचे अत्यंत कोमल झाले असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे मानसिक संवेदना शीघ्र होत असल्या पाहिजेत. मन चंचल व बुद्धी अतिशय अस्थिर झाली असेल तर अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण घडणे, हाड नसणे, त्यामुळे फटकळ बोलणे होऊन इतरांची मने दुखावली जाणे, अशा प्रकारचे आचरण होत असले पाहिजे. तसे असेल तर थोडे जरी मनाविरुद्ध काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल आहे. त्यामुळे मनस्ताप होऊ नये, म्हणून सतत सावधानतेने व विचारपूर्वक नोकरीतील आपले कर्तव्य पार पाडावे. ज्यांना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. तेच सुखाचे होईल. कोळसा, लोखंड व अन्य धातूचे साहित्य विक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा वाद, मतभेदामुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नवे स्नेहसंबंध वा प्रेमसंबंध निर्माण होणे शक्य दिसते. पण मंगळ-शुक्र योगामुळे कुसंगतीचा त्रास होणेही संभवते. जपा. मन:शांतीसाठी श्रीहनुमान उपासना करा.

(१२) मीन - या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, चंचल व लहरी

असा झाला असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे काही केले तरी चैन पडत नसावे. अशा परिस्थितीत कोणी समजविण्याचा प्रयत्न केला तरी ते असह्य होत असावे, असे दिसते. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड व व्रात्य झाली असण्याची शक्यता आहे. जपा. मन:शांतीसाठी शिवोपासना अवश्य करा, असे सांगावेसे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल नसला तरी शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना व गुप्त पोलीस खात्यातील मंडळीना काळ अनुकुल व प्रगतिकारक होणे संभवते. शासकीय नोकरदार मंडळीना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा वाद, मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशय विकाराचा किंवा उष्णता विकारांचा त्रास होणे संभवते. तसेच काहीना रक्तविकार वा मूळव्याधीचा त्रास होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. दूरच्या प्रवासाचे योग येण्याची शक्यता आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

=====ooo0ooo=====